
# ABFD Teen- नील नाडकर्णी

**मुलाखतकार: डॉ. विनता कुलकर्णी, (पिओरिया, इलिनॉय)**

ऑपेरा, पॉपसंगीत, आणि मराठी, हिंदी, पंजाबी व उर्दूतून हिंदुस्तानी शास्त्रीय व सुगम संगीत सहजतेने गाणारा, तसेच पाश्चिमात्य व मूळ भाषेच्या स्थानिक accent ला अजिबात बाधा न आणता दोन्ही प्रकारे गीते सादर करणारा न्यूजर्सीचा १७ वर्षीय नील



नाडकर्णी हा *American –Born –Confused Desi- ABCD* **नव्हे,** तर *American –Born –Focused Desi–* **ABFDचा** आदर्श म्हणावा लागेल. २००८ मधे EBC Radio,1170 न्यूजर्सी, येथे कॅरीओकी किंग हा पुरस्कार नीलने मिळवला. श्रुती मधुर आवाजाची देणगी लाभलेल्या नीलशी साधलेला हा संवाद!

**प्रश्नः** नील, तू अमेरिकेत जन्मलेला आणि वाढलेला आहेस. तरीसुध्दा तू उत्तम मराठी बोलतोस. तुझ्या घरची थोडी पार्श्वभूमी आम्हाला सांगशील का?

**नील:** मी जरी अमेरिकेत जन्मलो असलो तरी लहानपणापासून मी माझ्या आईबाबांबरोबर मराठीतच बोलतो. मी तीन चार वर्षांचा होईपर्यंत माझे आजी आजोबा आमच्याकडे रहात होते. पुढे मी शाळेत जायला लागल्यानंतर सुद्धा माझ्या आईबाबांबरोबर मराठी मधूनच बोलत राहिलो. घरी माझ्याबरोबर आई, बाबा, आजोबा, माझा छोटा भाऊ शिव, आणि छोटी बहीण जाई रहातात. शिव आणि जाई सुद्धा चांगले गातात.

**प्रश्नः** वयाच्या चौथ्या वर्षी तू सार्वजनिक कार्यक्रमात प्रथमच गायलास. स्वत:च्या गाण्याला स्वत:च तबल्याची साथही केलीस. एवढ्या लहानपणी हे कसं कायं जमलं?

**नील:** आमच्या एडिसन गावात डॉक्टर घाणेकरांकडे दर वर्षी गणपती असतो. तेथे लहान मुलांच्या कार्यक्रमात मी चार वर्षांचा असताना तबला वाजवून संत तुकारामांचा 'आधी बीज एकले' हा अभंग म्हटला होता. तो सगळ्यांना आवडला. माझ्या बाबांना थोडा तबला वाजवता येतो. मात्र आई आणि बाबा दोघांनाही संगीताची खूपच आवड आहे. अगदी लहानपणापासून मला आठवतं की कुठेही बाहेर जाताना आमच्या गाडीत नेहमी मराठी किंवा हिंदी गाणी लागलेली असायची. तेंव्हा पासूनच मला गाण्याची आवड लागली.

**विनता: थोडक्यात घरचे वातावरण आणि 'पेरेंटस इन्वॉल्वमेंट' हे महत्वाचे. ..**

**प्रश्न–** हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत तू कधीपासुन, आणि कुणाकडे शिकतोयसं?

**नील:** हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत मी साधारण सहा–सात वर्षांचा असताना शिकायला सुरुवात केली. माझ्या सर्वात पहिल्या गुरु श्रीमती अनुसया रॉय. त्यांच्याकडे काही वर्ष शिकल्यानंतर मी पं. जसराजांच्या senior disciple पंडिता तृप्ती मुखर्जी यांच्याकडे शिकायला जायला लागलो. त्यांच्याकडे शिकताना दर वर्षी उन्हाळ्यात पंडित जसराजजी (ऊर्फ 'बडे गुरुजी') आम्हाला शिकवायचे. शाळेत ११वीत अभ्यासाचं pressure जेंव्हा खूप वाढलं तेंव्हा मला त्यांच्याकडे जाणं जमेनासं झालं. सध्या मी श्री मनोज गोविंदराज यांच्याकडे गाणं शिकत आहे.

**प्रश्नः** गायकी बरोबरच तू काही वाद्य देखील वाजवतोस असं ऐकलंय. कोणकोणती वाद्य वाजवतोस? कुणाकडे शिकतोयस ?

**नील:** मी तीन वर्षांचा असताना आई बाबांकडे Violin शिकायचा हट्ट धरुन बसलो होतो म्हणून त्यांनी मला Violin शिकायला पाठवलं. त्यानंतर काही कारणामुळे ते शिक्षक दुसऱ्या गावी रहायला गेल्यामुळे ते शिक्षण तिथेच थांबलं. मी साधारण आठ नऊ वर्षांचा असताना Mrs. Cecere कडे Piano शिकायला सुरुवात केली. दोन वर्षं Western Classical Piano वाजवल्यावर मी श्री. बॉबी चटर्जी यांच्याकडे keyboard वाजवायला शिकू लागलो. माझ्या Piano शिक्षणाचा मला keyboard साठी बराच फायदा झाला. keyboard वर मी हिंदी गाणी वाजवतो. त्यापैकी थोडी गाणी माझ्या website वर आहेत. मी श्री समीर चटर्जी यांच्याकडे तीन वर्ष तबला देखील शिकलो आहे. Harmonium मात्र मी वेळेअभावी स्वतःच शिकलो. अर्थात् keyboard येत असल्यामुळे ते शिकणं खूप सोपं गेलं.

**प्रश्नः** एकंदरीत आवड असली की सवड मिळते तसेच त्या गोष्टी जरा सोप्या वाटतात नाही का? तू sound engineering चा कोर्सही केला आहेस, Choir मधेही भाग घेतोस... त्याबद्दल जरा अधिक सांग ना!

**नील:** मी Elementary School पासून शाळेच्या Choir मध्ये भाग घेत आलो आहे. Middle School मध्ये असताना मी Regions choir मध्ये पहिल्यांदा निवडला गेलो. High School मध्ये गेल्यापासून मी प्रत्येक वर्षी Regions व All State मध्ये निवडला गेलो. या दोन्ही साठी audition असते. गेल्या वर्षाच्या अखेरीला झालेल्या All Eastern Choir च्या audition मध्ये माझी पहिल्यांदाच निवड झाली याचा मला खूप आनंद वाटतो.

Sound Engineering मी माझे keyboard गुरुजी श्री बॉबी चटर्जी यांच्याकडे शिकलो. त्यांचा माझ्या संगीतातील यशात बराच मोठा वाटा आहे. त्यांनी मला keyboard पासून ते चांगलं जीवन

कसं जगावं इथपर्यंत सगळं शिकवलं. त्यांनीच पुढाकार घेऊन मी फक्त पंधरा वर्षांचा असताना माझी Demo-CD काढली. त्या सीडीवर मी माझ्या आवाजात मला देवासमान असलेल्या मोहम्मद रफी साहाब यांची सहा गाणी बॉबी अंकल यांच्या स्टुडिओमध्ये professionally record केली. त्यानंतर मी बॉबी अंकल कडून sound engineering बद्दल बरंच शिकून घेतलं आणि मग मी माझ्या बेसमेंट मध्ये एक छोटा स्टुडिओ बनवला. माझ्या website *http://www.neelnadkarni.com/* वर 'नवकल्पना नवरुपसे' हे गाणं मी माझ्या स्टुडिओमध्ये स्वतःच record केलं.

**प्रश्न:** नील, गाण्याबरोबरच, सध्या एकीकडे तू शाळेत १२वीत शिकतोयस, **चॅरिटी फंड रेजिंगसाठी** गाण्याचे कार्यक्रम करतोस, तेव्हा हे सगळं.. करतांना, अभ्यास, खेळ यात तुझी कितपत प्रगती आहे? १२ वी नंतर पुढे काय शिकण्याचा विचार आहे?

**नील:** शाळेच्या अभ्यासाबरोबर गाण्याचा सराव चालू ठेवणं हे जरा कठीणंच असतं, पण गाणं आणि संगीत हे माझ्या विरंगुळ्याचं साधन असल्यामुळे ते तेवढं जड जात नाही. मला टेनिस खेळायला खूप आवडतं. मी एक वर्ष शाळेच्या junior varsity team मधून खेळलो सुद्धा, पण नंतर मात्र मला टेनिस किंवा गाणं असा प्रश्न टाकण्यात आला आणि मी गाण्याची निवड केली.

मला Finance, Economics व Mathematics मध्ये interest आहे. Music minor घ्यायची सुद्धा इच्छा आहे.

**विनता**: फार छान ! तुला कदाचित माहित असेल,

प्राचीन काळापासून गणीताचे आणि संगीताचे नाते आहे. पायथॅगोरोस, पिसाचा लिओनार्डो.. आणि कित्येक गणितज्ञांनी गणिताचे पॅटर्न्स संगीतात शोधले आहेत.

जरा दुसऱ्या मुद्याकडे वळू या!

**प्रश्न:** पाश्चिमात्य व हिंदुस्थानी संगीत क्षेत्रामध्ये तुझ्या आवडीचे गायक.. गायिका, तसेच तुझी प्रेरणास्थानं कोणती आहेत?

**नील:** पं. जसराजजींकडून तर मी स्वतः शिकलो आहे. तसेच पं. भीमसेन जोशी आणि पं. वसंतराव देशपांडे यांचे गायन आवडते. मी आधी म्हटल्याप्रमाणे रफीसाहाब माझे दैवत आहे. त्यांच्यासारखा Semi-classical and light music गाणारा गायक, निदान माझ्या मते तरी पुन्हा झाला नाही. मला लता मंगेशकर, आशा भोसले, ह्रुदयनाथ मंगेशकर आणि सुधीर फडके यांची गाणी सुद्धा खूप आवडतात. पाश्चिमात्य संगीतात माझी आवड Pop like Michael Jackson and Billy Joel पासून R&B like Boyz II Men ते western classical like Luciano Pavarotti and Josh Grobanअशी आहे. या सगळ्या कलाकारांची गाण्याची तयारी व त्यांचे expressions वाखाणण्यासारखे आहेत.

**प्रश्न:** नुकतीच तुझी CD प्रकाशित झाली. त्या रेकॉर्डींगबद्दल काही सांगण्यासारखे अनुभव?

**नील:** अमेरिकेतील आणि भारतातील बाबांच्या काही मित्रांतर्फे माझी रफीसाहेबांच्या गाण्याची सीडी मुंबई मध्ये पत्की साहेबांकडे (मी त्यांना अशोककाका म्हणतो) पोचली. आणि मग 'पहिले वहिले प्रेम' या सीडीची कल्पना पुढे आली. ऐनवेळी बाबा/आई दोघांनाही त्यांच्या कामामुळे वेळ नसल्यामुळे मी एकट्यानेच भारतात जायचं ठरलं. माझे आजी आजोबा (आईचे आई बाबा) मुंबईत रहातात. मी त्यांच्याकडे अडीच आठवडे राह्यलो. त्यांनी व अशोककाकांनी सुद्धा मला खूपच मदत केली. त्यांच्याशिवाय हा CD-project शक्यच झाला नसता. सहगायक कलाकार वैशालीताई, बेलाताई, राकेशजी टबी–परीक शिवाय श्री सुरेश वाडकर यांच्या आजिवसन sound studio मधले तंत्रज्ञ यांचं मोलाचं सहकार्य लाभलं.

**विनता**: फार छान!

**प्रश्न:** What is your greatest strength, which will be helpful in your musical and academic career ? Can you tell us something about your Future plans and goals?

**नील:** I love music and hence am very passionate about it. I would like to have my own production company and bring all World cultures together.

**विनता**: नील, सगळ्या रसिक श्रोत्यांतर्फे तुला शुभेच्छा ! मुलाखतीचा शेवट तू गायलेल्या गाण्याने करणं योग्य ठरेल. तुझ्या आवाजातले एखादं मराठी गीत ऐकूयात का?

**नील: हो !** Here you go!

कृपया खालील संकेत स्थळाला भेट द्या.

http://neelnadkarni.com/mp3_songs/GahireGahire.wma